Maharashtra State Board Of
Secondary & Higher Secondary
Education
Latur Divisional Board
Latur-413531

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर
विभागीय मंडळ, लातूर-
४१३५३१

सुतमिल एरिया,कन्हेरी रोड, राजस्थान शाळेच्या पाठीमागे, गजानन नगर, लातूर
Divisional Chairman Ph :( O2382) 229258 Divisional Secretary Ph :( O2382) 258570 Email: - divsecretarylatur@gmail.com

जा.क./लाविमं/शाखा–प्रमाणपत्र/1902
दिनांक :– 03-12-2025

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा लातूर/नांदेड/धाराशीव

विषय :– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. 10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) परीक्षेचे द्वितीय गुणपत्रक/प्रमाणपत्रक, तात्पुरते प्रमाणपत्र व स्थलांतर प्रमाणपत्र REP प्रक्रियेद्वारे ऑनलाईन प्रणालीमधून देणेबाबत.

संदर्भः– राज्य मंडळाचे क्र.रा./परीक्षा–3/4002 दि.19/11/2025 चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. 10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) परीक्षेचे द्वितीय गुणपत्रक/प्रमाणपत्र हे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिफारसीसह मंडळ कार्यालयात ऑनलाईन चलनाचा भरणा करून देण्यात येत होते. तथापि द्वितीय गुणपत्रक/प्रमाणपत्रक(Duplicate Marksheet/ Certificate), तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) देणेसाठी दिनांक 19/11/2025 पासून मंडळाच्या WWW.mahasscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने कार्यपध्दती सुरू करण्यात येत आहे.

तेंव्हा मंडळ कार्यालयातील यापूर्वीची ऑनलाईन चलन भरण्याची प्रक्रिया दि.15/12/2025 पासून बंद करण्यात येत आहे. यापुढे द्वितीय गुणपत्रक/प्रमाणपत्र/ स्थलांतर प्रमाणपत्र व तात्पुरते प्रमाणपत्रासाठी REP प्रक्रियेद्वारे मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरून अवगत करावे.

01. द्वितीय गुणपत्रक/प्रमाणपत्र (Duplicate Marksheet/ Certificate), तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) यासाठी यापूर्वीचे सर्व प्रकारचे शुल्क रद्य करण्यात आले आहे. द्वितीय गुणपत्रक/प्रमाणपत्रक(Duplicate Marksheet/ Certificate), तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) प्रती प्रमाणपत्र रू. 500/(रूपये पाचशे फक्त) शुल्क भरणा करावे. (कोणत्याही प्रतीसाठी)
02. माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालय तसेच विद्यार्थ्यांना यासाठी आधारकार्ड OTP based च्या आधारे द्वितीय गुणपत्रक/प्रमाणपत्र (Duplicate Marksheet/ Certificate), तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) अर्ज करता येईल. अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्या संबंधीची कार्यवाही विभागीय मंडळाकडून 03 दिवसात पुर्ण करण्यात येईल.
03. सद्यस्थितीत 1990 सालापासून e-marksheet प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांचा सर्व data उपलब्ध आहे. त्यामूळे 1990 नंतरचे duplicate गुणपत्रक / प्रमाणपत्राची मागणी आल्यास त्याची Soft Copy अर्जदारास उपलब्ध होईल.
04. प्रमाणपत्राची मागणी पोस्टाने केल्यास ते Speed Post ने पाठवण्यात येईल.

कृ.मा.प.

05. प्रचलीत पद्धतीमध्ये द्वितीय प्रमाणपत्रावर संबंधित माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का, मुख्याध्यापक/प्राचार्य यांची स्वाक्षरी घेण्यात येत होती. तथापि सद्यस्थितीत ONLINE प्रणालीमध्ये माध्यमिक शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे शिफारसपत्र घेण्याची आवश्यकता नाही. तसेच द्वितीय प्रमाणपत्रावर संबंधित माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का, मुख्याध्यापक/प्राचार्य यांची स्वाक्षरी घेण्याची आवश्यकता नाही.

06. ऑनलाईन प्रणालीत एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. व पत्र आपल्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावे.

(स्वाक्षरी)
विभागीय सचिव,
लातूर विभागीय मंडळ, लातूर

प्रत माहितीस्तव :

1. विभागीय शिक्षण उपसंचालक विभाग लातूर.
2. शिक्षणाधिकारी (मा.) जि.प. कार्यालय लातूर /नांदेड/धाराशीव.
3. विभागीय सह/सहा.सचिव, लातूर विभागीय मंडळ, लातूर.
4. सर्व शाखा/विभाग प्रमुख लातूर विभागीय मंडळ, लातूर.
5. लेखाधिकारी, लातूर विभागीय मंडळ लातूर, यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

प्रत सविनय सादर :-

मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
भांबुर्डा- शिवाजीनगर, पुणे.